विभागाच्या केंद्र व राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क इ. योजनांच्या सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सहामाहीसाठी देय असलेल्या ५०% रक्कमेपैकी ६०% रक्कम तसेच पहिल्या ६ महिन्यासाठी अनुज्ञेय निर्वाह भत्याची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार सलंग्नित बँक खात्यावर जमा करणेबाबत मार्गदर्शक सुचना.

**महाराष्ट्र शासन**
**विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : इबीसी २०१७/ प्र.क्र.३४/ शिक्षण**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०९ जानेवारी, २०१८

<u>संदर्भ</u> : १. शासन निर्णय विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र. इबीसी - २०१७/ प्र.क्र. ७३/शिक्षण, दिनांक १५.१२.२०१७
२.संचालक,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.विजाभजसं/शिक्षण/प्रलंबित देयके/२०१७-१८/३९९,दि.२१/१२/२०१७

<u>परिपत्रक</u> :-

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परिक्षा फी इ. योजनांच्या ३१ मार्च,२०१७ पर्यंतचे प्रलंबित देयकांच्या ६०% इतकी रक्कम सबंधित शैक्षणिक संस्था/महाविद्यालयांना तदर्थ अदा करण्याबाबत तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सहामाहीकरीता शिक्षण शुल्क,परिक्षा शुल्काची सबंधित महाविद्यालयांना देय असलेल्या ५०% रक्कमेपैकी ६०% रक्कम तसेच पहिल्या ६ महिन्यासाठी अनुज्ञेय निर्वाह भत्याची रक्कम सबंधित विद्यार्थ्यांच्या आधार सलंग्नित बँक खात्यावर अदा करण्याबाबतचा निर्णय मा.मंत्रिमंडळाच्या दि.२१/११/२०१७ रोजीच्या बैठकित घेण्यात आला. या निर्णयाच्या अनुषंगाने वरील सदर्भ क्र.१ वरील दि.१५ डिसेंबर,२०१७ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. मा. मंत्रिमंडळाने घेतलेल्या सदर निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १९.१२.२०१७ रोजी दु. ०२.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नागपूर येथे घेण्यात आला. सदर बैठकीमध्ये मा. मंत्री महोदयांनी शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा फी योजनांचे प्रलंबित असलेले अर्ज तात्काळ निकाली काढण्याबाबत निर्देश दिले. तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सहामाहीकरीता देय असलेला निर्वाह भत्ता, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मा.मंत्रिमंडळाने दि.२१/११/२०१७ रोजीच्या बैठकित घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने वितरीत करण्याकरीता मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याचे आदेश दिले. सदर आदेशाच्या अनुषंगाने संचालक,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय पुणे यांनी त्यांच्या उपरोक्त सदर्भ क्र.२ येथील पत्राद्वारे दि.२१/१२/२०१७ रोजी त्यांचा प्रस्ताव शासनास सादर केला. मा.मंत्रिमंडळाने दि.२१/११/२०१७ रोजीच्या बैठकित घेतलेला निर्णय, या अनुषंगाने मा.मंत्री महोदयांचे निर्देश व विजाभज संचालनालयाने त्यांच्या दि.२१/१२/२०१७ रोजीच्या पत्राद्वारे सादर केलेला या विषयावरील प्रस्ताव इ. बाबींचा सखोल विचार करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सहामाहीकरीता

देय असलेले शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्याची अनुज्ञेय रक्कम वितरीत करण्याबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत-

अ) **<u>सन २०१७-१८ शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या सहामाही करीता शिक्षण शुल्क,परिक्षा शुल्काच्या देय रक्कमेच्या ५० % च्या ६० % रक्कम तसेच पहिल्या ६ महिन्यासाठी अनुज्ञेय निर्वाह भत्याची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न खात्यावर जमा करण्या करीता खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा :-</u>**

(१) ज्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी सन २०१७-१८ या वर्षाकरीता नविन महाडिबीटी पोर्टलवर आधार क्रमांच्या आधारे नोंदणी केलेले अर्ज तसेच या व्यतिरिक्त महाडिबीटी पोर्टलवर अद्याप नोंदणी करुन न शकलेल्या विद्यार्थांचे अर्ज संबंधित महाविद्यालयांने ऑफलाईन पध्दतीने विहित नमुन्यात प्राप्त करुन घ्यावे. अशा प्रकारे महाडिबीटीवर नोंदणी केलेले विद्यार्थी व नोंदणी करु न शकलेल्या विद्यार्थांचे महाविद्यालयात प्राप्त झालेले अर्जांच्या अनुषंगाने महाविद्यालयाने तपासुन/खात्री केलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क ची पहिल्या हप्त्याची ५०% च्या ६० % एवढी रक्कम तसेच पहिल्या ६ महिन्यासाठी अनुज्ञेय निर्वाह भत्याची रक्कम अदा करता येईल.

(२) ज्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केलेले आहेत, तसेच याव्यतिरिक्त महाडिबीटी पोर्टलवर नोंदणी न करु शकलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात प्राप्त झालेल्या ऑफलाईन अर्जांची तपासणी/खात्री करुन व विद्यार्थी पात्र आहे, असे प्रमाणित करुन महाविद्यालयाच्या प्राचार्यानी सदर अर्ज सबंधीत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडे सादर करावा.

(३) विद्यार्थ्याने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची मुळ प्रमाणपत्रावरुन खात्री करुन पात्र विद्यार्थ्याचे अर्ज महाविद्यालय सबंधीत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडे पाठवतिल.

(४) शासन निर्णयामध्ये विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नीत बॅक खात्यावर रक्कम जमा करणेबाबतचे निर्देश आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी महाडिबीटी पोर्टलवर अर्ज केलेले आहेत, त्यांच्या आधार क्रमांकाची पडताळणी (Verify) व त्या आधार क्रमांकाशी विद्यार्थ्याचे बॅक अकाउंट संलग्न करण्यात आले आहे याची खात्री / पडताळणी / Verification महाडिबीटीने करावी. आणि अशा विद्यार्थ्यांच्या यादीची प्रिंट काढून घेण्याची सुविधा महाविद्यालय व सहाय्यक आयुक्त यांना महाडिबीटी टिमने उपलब्ध करुन द्यावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत अशा विद्यार्थ्यांचे आधार क्रमांकाची पडताळणी (Verify) व त्या आधार क्रमांकाशी विद्यार्थ्याचे बॅक अकाउंट संलग्न करण्यात आले आहे याची खात्री / पडताळणी / Verification महाविद्यालयाने करावी.

(५) या परिपत्रका सोबत जोडलेले परिशिष्ट "अ" प्रमाणे विहीत केलेल्या हमीपत्रावर महाविद्यालयाने आपले संमतीपत्र व विद्यार्थी पात्रतेबाबतचे हमीपत्र १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर देणे बंधनकारक असेल.

(६) महाडिबीटी पोर्टलवर प्राप्त झालेले तसेच महाविद्यालयात ऑफलाईन प्राप्त झालेल्या अर्जांची महाविद्यालयाने खात्री व पडताळणी करुन सादर केलेल्या

यादीची सहाय्यक आयुक्त समाज कल्याण हे आवश्यक कागदपत्रांची (जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र व मागील वर्षाची परिक्षा उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र) पडताळणी करुन मंजूरी देतील.

(७) ज्या विद्यार्थ्याचे बिल तयार होईल तेवढया विद्यार्थ्याची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क तसेच अनुज्ञेय निर्वाह भत्याचे इसीएस जनरेट करुन सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण सदर रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यावर जमा करतील.

(८) बिल विहीत प्रचलीत नियमानुसार कोषागारात सादर केले जाईल.

(९) कोषागाराने मंजूर केल्यानंतर सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण (DDO) यांच्या खात्यावर देयकांची रक्कम जमा होईल.

(१०) सहाय्यकआयुक्त, समाजकल्याण(DDO)यांच्या खात्यातून रक्कम ईसीएसव्दारे संबंधीत बॅकेस विद्यार्थ्याच्या नावासह आधार संलग्न बॅक खात्यात जमा करणेसाठी तात्काळ पाठवतील.

(११) (अ) संबंधित बॅका विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बॅक खात्यावर अनुज्ञेय शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क तसेच निर्वाह भत्याची अनुज्ञेय रक्कम जमा करतील.

(ब) संचालक,विजाभज,इमाव व विमाप्र संचालनालय,पुणे यांनी बँकेसोबत प्रक्रिया ठरवून त्याप्रमाणे कार्यवाही होणेसाठी बँके सोबत MOU सामंजस्य करार करावा.

(क) सध्या ज्या बँका आयुक्त, समाजकल्याण पुणे यांनी निर्धारीत (Empanneled) केलेल्या आहेत.त्यांना हि जबाबदारी सोपविण्यात यावी.

**ब) उपरोक्त कार्यपध्दतीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सहाय्यक आयुक्तांची जबाबदारी राहील :-**

१) महाविद्यालयाने खात्री व पडताळणी करुन महाडिबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन फॉरवर्ड केलेल्या विद्यार्थ्याचे अर्ज तसेच महाडिबीटी शिवाय ऑफलाईन प्राप्त होणारे विद्यार्थ्यांचे अर्ज खालील कागदपत्रे तपासुन मंजूर करावेत.

- जात प्रमाणपत्र
- आवश्यक तेथे वैधता प्रमाणपत्र
- आवश्यकता असेल तेथे अधिवास प्रमाणपत्र
- मागील वर्षाचे उत्तीर्ण प्रमाणपत्र / पुरावा
- उत्पन्न दाखला
- विद्यार्थी व महाविद्यालयाचे बंधपत्र ( हार्ड कॉपी )
- शासन निर्णया प्रमाणे अवश्यक कागदपत्रे

२) विद्यार्थी व कॉलेजचे बंधपत्र प्राप्त करुन घेणे व तदनंतरच बिल जनरेट करणे.

३) बिलाची प्रिंट घेवून प्रचलित नियमानुसार कोषागारात सादर करणे.

४) सन २०१७-१८ मध्ये ज्या विद्यार्थ्यांना ५० % च्या ६० % शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काचा पहिला हप्ता तसेच पहिल्या ६ महिन्यासाठी अनुज्ञेय निर्वाह भत्याची रक्कम दिलेला आहे. त्याबाबतचे सर्व अभिलेखे जतन करणे.

५) कोणत्याही प्रकारे वित्तिय नियमांचा व प्रचलित शासन निर्णयांचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) विभागाअतर्गत राबवण्यात येणाऱ्या योजनेच्या अटि, शर्ती, नियमानुसार शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क तसेच निर्वाह भत्याच्या देय रकमेची गणना ( Calculation) योग्य रितीने होत आहे, याची जबाबदारी सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण यांची असेल.

**क) उपरोक्त कार्यपध्दतीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे महाडिबीटीची जबाबदारी राहील :-**

१) विभागाच्या आवश्यकतेनुसार / प्रपत्रानुसार ( उदा.बी स्टेटमेंटमधील फिल्ड नुसार ) माहिती सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण व सबंधित महाविद्यालयास पुरविणे.

२) शासन निर्णयामध्ये विद्यार्थ्याच्या आधार संलग्नीत बॅक खात्यावर रक्कम जमा करणेबाबतचे निर्देश आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी महाडिबीटी पोर्टलवर अर्ज केलेले आहेत, त्यांच्या आधार क्रमांकाची पडताळणी (Verify ) व त्या आधार क्रमांकाशी विद्यार्थ्याचे बॅक अकाउंट संलग्न करण्यात आले आहे याची खात्री / पडताळणी / Verification महाडिबीटीने करावी. आणि अशा विद्यार्थ्याच्या यादीची प्रिंट काढून घेण्याची सुविधा महाविद्यालय व सहाय्यक आयुक्त यांना महाडिबीटी टिमने उपलब्ध करुन द्यावी.

३) महाडिबीटी जी माहिती विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागास पुरविणार आहे, त्याच्या वैधतेची जबाबदारी संबंधित विभाग व महाडिबीटी यांची असेल.

४) ज्या विद्यार्थ्याची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क ची रक्कम अदा केली अशा विद्यार्थ्यांना ती पुन्हा दिली जाणार नाही यासाठी flagig करण्याची जबाबदारी महाडिबीटी टिमची असेल.

५)महाडिबीटीने कॉलेज निहाय व अभ्यासक्रमनिहाय व कास्ट कॅटगरी निहाय यादी Dist clerk ID व Asst. Commm.ID वर उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी

उपरोक्त कार्यपध्दतीच्या अनुषंगाने सुलभ कार्यवाही करण्याकरीता शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मिळण्यासाठी विद्यार्थी व आणि महाविद्यालयाने द्यावयाच्या हमीपत्र/ प्रतिज्ञापत्राचा नमुना परिशिष्ट "अ" (मधील नमुना 'अ' व 'ब') या परिपत्रकासोबत जोडला आहे. सदर नमुना व उपरोक्त कार्यपध्दतीचा अवलंब तसेच शासन निर्णय दि.१५/१२/२०१७ मधील सुचनांचे पालन करुन शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क ची प्रलंबित प्रकरणे निकाली काढून पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या आधार संलंग्नित बँक खात्यावर रक्कमा जमा करण्यात याव्यात. सदर शासन परिपत्रक हे विशेष चौकशी पथकाने कारवायीची शिफारस केलेल्या दोषी संस्था व अनुज्ञेय नसलेले अभ्यासक्रम वगळुन अनुज्ञेय संस्था व अभ्यासक्रमास लागु राहील. तसेच या परिपत्रकातील कार्यपध्दती ही सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीसाठीच लागु असेल. पुढील सहामाहीकरीता वेगळयाने सुचना निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०११०१५२४५०८४२२ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb8274 57be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489 ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.01.31 12:06:45 +05'30'

(भा.र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
४. मा.राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. प्रधान सचिव, महसूल व वन/वित्त/ नियाजोन/ग्रामविकास/गृह निर्माण/उघोग,उर्जा व कामगार/उच्च व तंत्रशिक्षण/माहिती व तंत्रज्ञान /वैघकीय शिक्षण व औषधी द्रव्ये/कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मा.सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
९. संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. सर्व मंत्रालयीन विभाग
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१४. व्यवस्थापकीय संचालक, वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, मुंबई
१६. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई
१७. संचालक, उच्च शिक्षण, पुणे
१८. संचालक, वैघकिय शिक्षण व संशोधन, मुंबई
१९. संचालक, माहिती व तंत्रज्ञान मुंबई.
२०. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
२१. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग
२२. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२३. सर्व अध्यक्ष, विभागीय जात प्रमाणप्रत्र पडताळणी समिती
२४. सर्व कार्यासन अधिकरी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई.

**शासन परिपत्रक क्रमांक शिष्यवृत्ती-२०१७/प्र.क्र. ३४/शिक्षण सोबतचे**

**परिशिष्ट “अ”**

# सन २०१७-१८ ची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मिळण्यासाठी हमीपत्र / प्रतिज्ञापत्र

**अ) विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे हमीपत्र / प्रतिज्ञापत्राचा नमुना**

१) मी / आम्ही खाली सही करणार / करणारे प्रतिज्ञापन करतो की, शिष्यवृत्ती मिळण्याबाबतच्या अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. अर्जात वरीलप्रमाणे दिलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदरची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंडविधाना प्रमाणे होणाऱ्या दंडास / शिक्षेस मी / आम्ही पात्र आहे / आहोत. त्यापैकी कोणतीही माहिती व निवेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर / आम्हावर बंधनकारक असेल अशी मी / आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची रक्कम जास्तीची मिळाली तर मी / आम्ही परत करेन / करु अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसूल करण्यात येणारी रक्कम मी / आम्ही पूर्णपणे परत करण्याची हमी देतो. उत्पन्नाची व जातीची माहिती खोटी आढळल्यास माझे / माझे पाल्याचे विरुध्द होणाऱ्या कारवाईस मी / आम्ही स्वत: जबाबदार राहू.

२) मी अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे मी सक्षम अधिकाऱ्याकडून / प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेली असून ती कागदपत्रे खरी असून योग्य मार्गाने मिळविलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार / दुरुस्ती / बदल केलेला नाही. ती खोटी अथवा नकली नाहीत हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो. अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे खोटे अथवा बनावट आढळल्यास त्यास मी / आम्ही पुर्णत: जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायदा कलम १९९ व २०० नुसार लागू होणाऱ्या शिक्षेस मी पात्र राहीन याची मला पुर्ण जाणीव आहे.

३) माझे अर्जानुसार मला जर शिष्यवृत्तीची जास्तीची रक्कम मिळाली तर ती मी / आम्ही परत करेन / करु. अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसूल करण्यात येणारी रक्कम मी / आम्ही पूर्णपणे परत करण्याची हमी देतो.

४) सन २०१७-१८ या वर्षाची पहिल्या हप्त्याची शिक्षण शुल्क , परिक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम बॅक खात्यात जमा होताच मी ती महाविद्यालयास सात दिवसात जमा करुन रितसर पावती प्राप्त करुन घेण्याची माझी / आमची जबाबदारी असेल. शुल्क महाविद्यालयास जमा न केल्याने भविष्यात उदभवणा-या परिणामास मी / आम्ही वैयक्तीक जबाबदार असु असे प्रतिज्ञापुर्वक हमीपत्र / बंधपत्र मी / आम्ही सादर करीत आहोत.

ठिकाण :

दिनांक :

( अर्जदाराच्या वडीलांची / पालकाची सही व नाव )　　　　( अर्जदाराची सही व नाव )

**ब) महाविद्यालयाने द्यावयाच्या हमीपत्र / प्रतिज्ञापत्राचा नमुना**

१) उपरोक्त ---------------------------------- अर्जदाराने वरील हमीपत्र / प्रतिज्ञापत्रात दिलेली सर्व माहिती, त्याच्या कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न, तो सध्या शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, त्याचे वसतिगृह, वसतिगृहा बाहेर राहण्याची माहिती शुल्करचना, जातीचे प्रमाणपत्र इ. कागदपत्रांचे मुळ प्रतिवरुन पूर्णपणे तपासलेली असून ती बरोबर आहे.त्यामुळे मी श्री / श्रीमती -----------------------------------------------------( प्राचार्याचे नाव )-------------------------------------- संस्थेच्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत आहे. त्या अधिकारात उपरोक्त विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क इतर शुल्क मंजूर करण्याकरीता शिफारस करीत आहे.

२) मी निम्नस्वाक्षरीत हमी देतो की, अर्जदाराची शिक्षण शुल्क व इतर शुल्काची रक्कम जी महाविद्यालयाकडे सुपूर्द केलेली आहे, ती ज्या प्रयोजनासाठी दिलेली आहे. त्या विशिष्ट प्रयोजनासाठी त्याचा विनियोग करीन आणि त्याबाबीचे हिशोब ज्या प्राधिकाऱ्याने ही तरतूद सुपूर्द केलेली आहे, त्या प्राधिकाऱ्याकडे नियमितपणे पाठवेन. विद्यार्थी सोडून गेल्यास किंवा त्याने विनापरवानगी अभ्यासक्रमात बदल केल्यास किंवा अन्य कोणत्याही अनियमिततेमुळे त्याचा प्रवेश रदद झाल्यास त्यास मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क परिक्षा शुल्काची रक्कम सरकारी लेख्यात जमा झाल्याशिवाय त्याचे शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला जारी करणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य या नात्याने माझ्याकडे राहील.

३) विद्यार्थ्याच्या अर्जामध्ये दिलेली माहिती मी अर्जदाराने दिलेल्या मुळ कागदपत्राचे आधारे तपासलेली आहे. तसेच अर्जदारांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या मूळ प्रती तपासलेल्या असून सादर केलेल्या कागदपत्रामध्ये कोणताही बदल / खाडाखोड / दुरुस्ती / फेरफार नाही.

४) मी निम्नस्वाक्षरीत प्रमाणित करतो की, वरील अर्जदाराने शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क मंजूरीसाठी सादर केलेली माहिती योग्य व बरोबर असून सदर अर्जदार हा आमचे महाविद्यालयामधील नियमित विद्यार्थी आहे त्याने कोणत्याही अन्य महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला नाही, तसेच त्याची सरासरी उपस्थिती ७५% पेक्षा अधिक आहे. तसेच सदर विद्यार्थ्याकडून महाविद्यालयाने कोणतेही शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर अनुज्ञेय शुल्क घेतलेले नाही.

५) आमचे महाविद्यालय हे मान्यता प्राप्त आहे, ते अनुदानित / विनाअनुदानित आहे, मान्य झालेले अभ्यासक्रम हे संबंधित सक्षम प्राधिका-यांनी मान्यता दिलेले आहेत, प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ही मान्यता दिल्यानुसारच आहे व त्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून मागासवर्गीय विद्यार्थ्याचे अर्ज संबंधित सक्षम कार्यालयास फॉरवर्ड केले आहेत, त्यांची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व इतर शुल्क सुध्दा, संबंधित सक्षम प्राधिकारी / विद्यापीठ यांनी मान्य केल्याप्रमाणेच असून ती अवास्तव किंवा अवाजवी नाही. शासन / विद्यापीठ / सक्षम प्राधिकारी यांचे प्रचलित नियम व अटी यांचे पालन करुन व त्यामधील नियम, अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यार्थ्याचा अर्ज योग्य व नियमानुसार असून, त्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्काची देय रक्कम, संबधितांचे आधार संलग्न बॅक खात्यावर जमा होणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. त्यामध्ये अनियमीतता उणीवा व गैरप्रकार झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही महाविद्यालयाची असेल.

जावक क्रमांक --------------

दिनांक ---------------

ठिकाण ------------------

प्राचार्याची स्वाक्षरी
नाव व पदनाम
महाविद्यालयाचा शिक्का

टिप - विद्यार्थ्यांनी / पालकांनी व महाविद्यालयांनी द्यावयाचे हमीपत्र प्रतिज्ञापत्र एकत्रितच संलग्न द्यावयाचे आहे. वेगवेगळया कागदावर द्यावयाचे नाही.